अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक : अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. २० मार्च २०२५ | वर्ष १० वे | अंक ३२ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## देशातील ४५ टक्के आमदारांविरोधात फौजदारी गुन्हे

ब्रम्हपुरी/का.प्र.

देशातील ४,०९२ आमदारांपैकी म्हणजे जवळपास ४५ टक्के आमदारांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल आहेत. पक्षनिहाय विचार केल्यास भाजपच्या १६५३ आमदारांपैकी ३९ टक्के म्हणजे ६३८ आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. यापैकी ४३६ आमदार (२६ टक्के) गंभीर आरोपांचा सामना करत आहेत. तर काँग्रेसच्या ६४६ आमदारांपैकी ३३९ आमदारांवर फौजदारी गुन्हे असून यापैकी १९४ जणावर गंभीर आरोप आहेत. राज्यानुसार पाहिल्यास महाराष्ट्रातील ६५ टक्के आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत.

असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) वा संस्थेने २८ राज्य आणि तीन केंद्रशासित प्रदेशच्या विधानसभेतील ४,१२३ आमदारांपैकी ४,०९२ आमदारांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करत यासंबंधीचा अहवाल सादर केला आहे. २४ आमदारांचे प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करता आले नाही. कारण त्यांचे प्रतिज्ञापत्र हे अत्यंत खराब पद्धतीने स्कॅन करण्यात आले होते. तर विधानसभांमध्ये ७ जागा रिक्त आहेत. विश्लेषणानुसार ४,०९२ आमदारांपैकी १,८६१ (४५ टक्के) आमदारांनी आपल्यावर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे जाहीर केले आहे. यापैकी १,२०५



आमदारावर खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि महिलांविरोधातील अत्याचार यासारखे गंभीर आरोप आहेत. याबाबतीत राज्यानुसार आंध्र प्रदेश हे आघाडीवर आहे. आंध्रातील १३८ (७९ टक्के) आमदारांनी आपल्यावर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे घोषित केलेले आहे. यापाठोपाठ केरळ आणि तेलंगाणातील प्रत्येकी ६९ टक्के आमदारांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल आहेत. यानंतर बिहारमधील ६६ टक्के, महाराष्ट्रातील ६५ टक्के आणि तामिळनाडूतील ५९ टक्के आमदारांनी आपल्यावर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे जाहीर केलेले आहे. महाराष्ट्रातील ६५ टक्के आमदारांपैकी ४१ टक्के आमदारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

पक्षनिहाय विचार केल्यास तेलुग देसम पक्षाच्या (तेदेप) १३४ आमदारांपैकी ११५ जणांनी आपल्यावर फौजदारी गुन्हे असल्याचे सांगितले आहे. यापैकी ८२ आमदार हे गंभीर स्वरूपाच्या आरोपांचा सामना करत आहेत. तामिळनाडूतील द्रमुकच्या १३२ पैकी ९८, पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या २३० पैकी ९५, आपच्या १२३ पैकी ६९, समाजवादी पक्षाच्या ११० पैकी ६८ आमदारांनी आपल्यावर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले आहे.

विश्लेषणानुसार एकूण आमदारांपैकी ५४ जण खुनाच्या खटल्याचा सामना करत आहेत. तर २२६ आमदारांवर खुनाच्या प्रयत्नाचे आरोप आहेत. १२७ आमदार महिलांविरोधातील अत्याचाराच्या प्रकरणात अडकलेले आहेत. यापैकी १३ वर बलात्काराचा आरोप आहे.

## ब्रम्हपुरीत शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव पालखी सोहळा उत्साहात दिनांक १६ व १७ मार्चला संपन्न झाला. यानिमित्त विविध स्पर्धा, गोंधळ, किल्ले व शस्त्र प्रदर्शन, वारकरी कीर्तन, पालखी सोहळयाला जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला.

जयंतीनिमित्त सोमवारी सायंकाळी भवानी माता मंदिर ते शेष मंदिर पर्यंत पालखी सोहळ्यात ढोल ताशा पथक, वारकरी भजन, अश्व, लेझीम पथक, शिवाजी महाराजांच्या वेषातील मावळे पालखीत विराजमान शिवप्रतिमा पारंपारिक वेशभूषेतील महिला मंडळ, तरुण व आतिषबाजी यामुळे चौका चौकात पालखी सोहळा बघण्यास प्रचंड गर्दी झाली . शेष मंदिर परिसरात पालखी सोहळा पोहोचल्यावर महाआरती होऊन खामगाव येथील शिवकथाकार शिवाजी महाराज झामरे यांचे



शिवजन्मोत्सवावर ओजस्वी वाणीतील बहारदार वारकरी कीर्तन झाले. राष्ट्र ज्ञान स्पर्धा व वेशभूषा स्पर्धेचा विजेत्यांना या सोहळयात गौरविण्यात आले.

भवानी माता मंदिरात दिनांक १६ ला झालेल्या गोंधळात अंबाबाईचा गजर करण्यासाठी ब्रह्मपुरी शहरातील विविध भजन मंडळ यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. शिवरायांचे आरमार या विषयावर आधारित किल्ले व शस्त्र प्रदर्शनाला अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभला.

**पाणी अडवा, पाणी जिरवा...**

## क्रांतीवीर बाबुराव शेडमाके जयंती साजरी

नागभिड/प्रतिनिधी

स्थानिक सम्राट अशोक नगर येथे मोठ्या उत्साहात विर बाबुराव शेडमाके यांची जयंती साजरी करण्यांत आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून रामकृष्णजी उईके उपस्थित होते. प्रमुख पाहुणे प्रा.एस एस बावणकर सर, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक टि.पी. मेश्राम सर तसेच सिंधुताई उईके, नंददिप तुमराम, सुधीर सयाम शिक्षक, हंसराज कोवे, अशोक कोल्हे आदींची उपस्थिती होती.

प्रसंगी सुधीर सयाम, प्रा. एस.एस. बावणकर, टि.पी. मेश्राम यांनी क्रांतीवीर बाबुराव सडमाके यांच्या जीवनकार्यावर प्रकाट टाकला. कार्यक्रमाला दर्शना मेश्राम, भावना सयाम, मंजूताई सुरपाम यांसह आदिवासी महिलांची उपस्थिती होती.



## संपादकीय...

# अस्वस्थ बळीराजा

भारतीय लोकजीवन आजही मोठ्या प्रमाणावर कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. एकीकडे शहरीकरण वाढत असताना परंपरागत स्वरूपात जीवनाधार असलेल्या या क्षेत्रातील शेतकऱ्याला न्याय मिळाल्याचे दिसत नाही. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील सर्वात मोठा असंघटित घटक कोणता असेल तर तो शेतकरीच. कोणतेही शासन असो, राज्यकर्ते शोषकांच्या आणि शेतकरी शोषितांच्या भूमिकेत असतो. गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांची चर्चा होत आहे आणि त्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न ऐरणीवर आहे. २०२४ या वर्षात तब्बल २,७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची आकडेवारी सरकारकडून जारी करण्यात आली आहे. हे चित्र अतिशय चिंताजनक आहे. केंद्राने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आजवर अनेक आयोग नेमले, पण अद्याप तोड काही निघालेली नाही. मते मिळवण्यासाठी सरकार समाजातील इतर अनेक घटकांसाठी सवंग लोकप्रियता मिळवून देणाऱ्या घोषणा करीत असताना शेतकरी मात्र आशेने सरकारकडे डोळे लावून बसला. इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या का करीत आहे याचे चिंतन करायला सरकारकडे वेळ नाही.

देशाच्या विकासात शेतकरी मोठा वाटा उचलत असले तरी या विकासात शेतकरी आणि शेतमजूर यांना कधीच योग्य वाटा मिळाला नाही, ही खेदाची बाब आहे. देशाचे शेती उत्पन्न वाढले तरी देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न कायम घटतच राहिले. दुर्दैवाची बाब म्हणजे देशातील शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या या महाराष्ट्रात होत आहेत. येथील शेतकऱ्यांसमोर अनेक आर्थिक प्रश्न आहेत. कमी उत्पन्न, वाढलेला खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारभाव अस्थिरता यामुळे अनेक स्वरूपाच्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने उत्पन्न कमी होते. शेतीसाठी कर्ज घेणे आवश्यक असले तरी वाढत्या व्याजदरामुळे नुकसान होते. योग्य बाजारपेठ आणि साठवणुकीची सोय नसल्याने मालाला योग्य भाव मिळत नाही, शेती आणि शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या योजना आणि मदतीचा अभाव असल्याने शेतकऱ्यांची ही स्थिती सुधारत नाही. केवळ शेतकरी हा आपला केंद्रबिंदू आहे याची जाहिरातबाजी करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी शेताच्या बांधावरच जावे लागेल. शेतकऱ्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असते. त्याची यादी करायची तर ती लांबलचक होईल. शहरवासीयांना त्यांच्या समस्यांची फारशी कल्पना येत नाही. राजाने मारले आणि पावसाने झोडपले अशी त्यांची दयनीय अवस्था आहे. अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांना त्यांना तोंड द्यावे लागते. पाण्याची कमतरता, कृत्रिम खतांचा अभाव, सिंचन योजना, सेंद्रिय खतांचा वापर, तंत्रज्ञानाची विस्तृत माहिती नसणे अशा अनेक समस्या आहेत. सरकारला या सगळ्यावर बारकाईने काम करावे लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या एका दिवसात सुटणार नाहीत, हे खरे आहे. पण योजनाबद्ध आणि सातत्यपूर्वक काम केले तर शेतकऱ्यांची विपन्नावस्था दूर करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. प्रत्येक व्यवसायाला वित्त आणि कर्जाची आवश्यकता असते. शेतीही त्याला अपवाद नाही. मात्र भारतातील कर्जव्यवस्था गरीबांना अनुकूल नाही. लहान शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत आणि सहकारी बँकांकडून कर्ज मिळणे जवळजवळ अशक्य आहे. ही स्थिती बदलायला हवी.

शेतकऱ्यांना त्यांच्या माती आणि हवामान परिस्थितीला अनुकूल असलेली पिके घेण्यास प्रोत्साहित केले गेले पाहिजे. आडते आणि मध्यस्थांकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते. शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने विविध योजना सरकारला राबवता येतील. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले पाहिजेत. वर्षानुवर्षे असलेली साखळी तोडणे ही कठीण बाब असली तरी अशक्य कोटीतील अजिबात नाही. त्यासाठी प्रसंगी विरोधही पत्करावा लागेल. आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्याकडे कसे पोहचेल हे पाहिले गेले पाहिजे. पिकांची स्थिती पहाणे, पीक फवारणी, मोजणी अशा कामांसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत जास्त कसा वाढेल हे पाहिले गेले पाहिजे. शेतकऱ्याचे जीवन कसे कमी जिकिरीचे करता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्याची जबाबदारी सरकारची आहे. विशेषतः लहान शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यावर भर दिला गेला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे आणि खेदाची बाब ही आहे की दिवसेंदिवस शेतकऱ्याची प्रतिष्ठा कमी होत चालली आहे. बळीराजा हा गुलाम आहे असे गृहीत धरले जात आहे. हा समज खोटा पाडण्याचे आणि शेतकऱ्याला त्याची प्रतिष्ठा परत मिळवून देण्याचे काम सरकारला पार पाडावे लागेल. देश सुजलाम सुफलाम करणाऱ्या शेतकऱ्यालाच दरिद्रीनारायण ठेवून अजिबात चालणार नाही.

# राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत ने.हि. कन्या विद्यालय, ब्रम्हपुरीचा गौरव

## विद्यार्थिनींनी तयार केली अपघात नियंत्रक ड्रायव्हिंग सेफ्टी डिवाइस स्पेक

ब्रम्हपुरी/का.प्र.

पुणे येथील बालेवाडी स्टेडियम मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत




नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय, ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर या शाळेच्या वर्ग ०८ च्या विद्यार्थिनी आनंदी मनोज तलमले व क्रिंजल जयप्रकाश पाटणी यांनी तयार केलेल्या 'ड्रायव्हिंग सेफ्टी डिवाइस स्पेक' या प्रतिकृतीचा ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देऊन राज्यात गौरव करण्यात आला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे संचालक डॉ. श्री राहुल रेखावार यांच्या संकल्पनेतून यंदा प्रथमच हॅकेथॉन या स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये करण्यात आले होते. विशिष्ठ समस्या सोडविण्यासाठी व नवीन संधी ओळखण्यासाठी स्पर्धक एकत्र येवून एकमेकाशी संवाद साधतात व नवनिर्मितीचे सादरीकरण करतात. हॅकेथॉनाने मानवी कौशल्य (6C) या १५ विषयांचा समावेश करुन त्यावर आधारित राज्य प्रदर्शनाचे आयोजन दि. १२ मार्च रोजी पुणे येथील बालेवाडी स्टेडियम मध्ये करण्यात आले होते. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातून ८८ स्पर्धकांची निवड करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये ने.ही.कन्या विद्यालय सहभागी झालेला होता. त्यांनी 'ड्रायव्हर सेफ्टी डिवाइस स्पेक' ही प्रतिकृती तयार केलेली होती. रात्रीला ड्रायव्हरला गाडी चालवताना झोप येत असेल तर त्याला अलार्म देऊन ती जागा करणार असा स्पेक तयार केला आहे. या साधनाचा वैशिष्ट्य म्हणजे 'ड्रायव्हर जर तीन सेकंद पर्यंत जागा झाला नाही तर गाडी सुद्धा बंद होईल.' अशा नवीन उपकरणाची निर्मिती केली आहे. सादर उपकरणाच्या संशोधनाकरिता नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन अत्यंत महत्वाचे ठरले असून त्यांनी विद्यार्थिनींना संशोधनाकरिता मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, परिवेक्षिका खंडाते मॅडम यांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. सदर उपकरण तयार करण्यासाठी शिक्षक जितेंद्र बेले व शिक्षिका संध्या बनसोड यांचे मार्गदर्शन लाभले.

# तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती मिळणार

## माजी आमदार प्रा. देशकर यांच्या प्रयत्नांना यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांची निकड लक्षात घेता, ब्रह्मपुरी तालुक्यातील प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती उपलब्ध करून देण्यात यावी. यासंबंधी ब्रह्मपुरी तालुक्यातील भाजपा प्रमुख पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांच्या नेतृत्वात ब्रह्मपुरी तालुक्यातील शिष्टमंडळ राज्याचे महसूल मंत्री मान.नाम.चंद्रशेखरजी बावनकुळे यांना भेटले आणि अतूलभाऊंनी घरकुल लाभार्थ्यांची रेती संदर्भातील अडचण सांगितली. नाम. बावणकुळे यांनी देखील तात्काळ दाखल घेऊन जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी ब्रह्मपुरी यांना निर्देश देताना सांगितले की प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी. आणि माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर हे ज्या सूचना करतील त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यात हयगय सहन करणार नाही.

त्यानुसार ब्रम्हपुरी पंचायत समितीचे संवर्ग विकास अधिकारी रवींद्रजी घुबडे यांनी घरकुल लाभार्थ्यांना दोन ब्रास रेती उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. अतुलभाऊंच्या यशस्वी कार्याबद्दल प्राचार्य अरुण शेंडे तालुका अध्यक्ष ब्रह्मपुरी, वंदना शेंडे जिल्हाध्यक्ष भाजपा महिला मोर्चा चंद्रपूर, इंजि. अरविंद नंदुरकर, तनय देशकर, साकेत भानारकर, मनोज वटे, मनोज भूपाल, प्रा.रामलाल महादेव दोनाडकर, ज्ञानेश्वर दिवटे, गोपाल ठाकरे, प्रा.यशवंत आंबोरकर, हेमंत ठाकरे, अनिल तिजारे, राजेश्वर मगरे, प्रा.संजयजी लांबे आदींनी समाधान व्यक्त करून प्रा.अतुल भाऊ देशकर यांचे कार्याचे अभिनंदन केले आहे.

## विनोदिनी

बबड्याः आई, ए... आई. युसलेस आहेस तू... मी तुला मास्क आणायला सांगितले होते... हा ३ दोरीवाला मास्क का आणलास? त्याची एक दोरी तोंडासमोर लोंबत होती. आत्ता व्हिडीओ कॉन्फरन्सला सगळे कलीग हसत होते.

आसावरी : अरे बापरे, तुला नेमकी तीच पिशवी दिसली का? अरे तुझे मास्क या पिशवीत आहेत, त्या पिशवीत शेजारच्या आक्कांच्या नातीसाठी आणलेले लंगोट आहेत...

बबड्या .... काय तू ..!!!

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत तालुक्यातील गावांचा समावेश करणार

## पारडी ठवरे येथे वॉटर शेड जनजागरण यात्रेचा समारोप - आ. बंटी भांगडिया

नागभीड/प्रतिनिधी

‘पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी शेतीच्या विकासासाठी केंद्रिय अर्थसंकल्पात मोठी तरतूद केलेली असुन यातील विविध योजनांची माहिती व तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत वॉटर शेड जनजागरण यात्रा आपल्या गावात आलेली आहे. या वॉटर शेड यात्रेच्या माध्यमातून ज्या योजना आहेत त्या सर्व योजनांचा फायदा घ्यावा,’ असे आवाहन आमदार बंटीभाऊ भांगडिया यांनी केले. या योजनेअंतर्गत नागभीड तालुक्यातील अनेक गावांचा समावेश नसल्याने त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.



नागभीड तालुक्यातील पारडी ठवरे या गावामध्ये कृषी विभाग व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वॉटर शेड यात्रेचे आगमन झाले असता त्यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय समारोपीय कार्यक्रमामध्ये ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर पारडी ठवरे चे सरपंच युवराज दोनोडे, उपसरपंच नंदकिशोर खोब्रागडे, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गजपुरे, कृउबास सभापती आवेश पठाण, माजी पं. स. सदस्य संतोष रडके , नागभीड न.प.चे माजी उपाध्यक्ष गणेश तर्वेकर , जिल्हा जलसंधारण अधिकारी निलिमाताई मंडपे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व्ही. डी. घोटकर, तालुका कृषी अधिकारी शिवकुमार पुजारी आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थित होती. सलग आठ दिवस चाललेल्या चंद्रपुर जिल्ह्यातील या यात्रेचा समारोप पारडी ठवरे येथे होत असतांना वॉटरशेड यात्रा प्रकल्प समन्वयक माणिक लांडगे यांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबाबत त्यांचा आमदार बंटीभाऊ च्या हस्ते गौरव करण्यात आला. तत्पूर्वी वाटरशेड रथयात्रेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमानंतर ही रथयात्रा गडचिरोली जिल्ह्याकडे मार्गस्थ करण्यात आली.

प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी शिवकुमार पुजारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शाम हेडाऊ यांनी तर आभार प्रदर्शन कृषी पर्यवेक्षक आत्राम यांनी केले. कार्यक्रमाला महिला शेतकऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

❀❀❀❀❀❀

# तालुकास्तरीय पिक्चर कलरिंग कॉम्पिटिशनचा बक्षीस वितरण सोहळा दिमाखात पार पडला

ब्रम्हपुरी/का.प्र.

सत्यशोधक फाउंडेशन ब्रह्मपुरी तसेच शाश्वत क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात



आलेल्या तालुका लेवल पिक्चर कलरिंग कॉम्पिटिशन या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा अखेर ०९ मार्च रोज रविवारला ब्रह्मपुरी येथील राजस्थानी भवन या ठिकाणी पार पडला.

याप्रसंगी बक्षीस वितरण सोहळ्याला अध्यक्ष म्हणून डॉ. एन. एस. कोकोडे, उद्घाटक म्हणून ॲड. आशिष गोंडाने, प्रमुख पाहुणे सोमेश्वर एलचलवार, दीपक देवतळे गटशिक्षणाधिकारी आरमोरी, मयूर लाडे गटशिक्षणाधिकारी ब्रह्मपुरी, प्रभाकर बाशिंगे विस्तार अधिकारी आरमोरी हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये अ आणि ब अशा दोन्ही गटातून ब्रह्मपुरी, आरमोरी व नागभीड या तालुक्यातील बऱ्याच शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

ब्रह्मपुरी तालुक्यामध्ये अ गटात देवांश महेश येळणे प्रथम, श्रावणी प्रमोद मोहनकर द्वितीय, तर तनुश्री उमेश करंडे तृतीय, तसेच ब गटात सोहम सचिन ठेंगरी प्रथम, पूर्वा प्रवीण दशसहस्त्र द्वितीय, निधी नितीन येरपुडे तृतीयहे विद्यार्थी विजयी ठरले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रत्येकी सायकल, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

सूत्रसंचालन समीक्षा प्रकाश पंडित, प्रास्ताविक कुशांतकुमार चाटोरे यांनी तर आभार प्रदर्शन हिमांशू कोटरंगे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय पत संस्थेची निवडणूक अविरोध

ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ब्रम्हपुरी या संस्थेच्या संचालक मंडळाच्या



अध्यक्ष
अशोक रामटेके



उपाध्यक्ष
डॉ. एकनाथ रामटेके



सचिव
प्रभाकर रामटेके

निवडणुकीत अशोक रामटेके हे अनुसुचित जाती/जमाती गटातुन, नरेंद्र बांते हे इतर मागासवर्गीय गटातुन तसेच डॉ. एकनाथ रामटेके, प्रभाकर रामटेके, सुधिर अलोणे, जगदिश मेश्राम, आसाराम बोदेले, सुभाष मेश्राम, डॉ. विनोद नागदेवते, प्रमोद समर्थ व लकी फेरवानी हे सर्वसाधारण गटातुन असे ११ जण संचालक म्हणुन अविरोध निवडून आल्याचे तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक स्वप्नील पाटील यांनी २७ फेब्रुवारीला जाहीर केले.

१२ मार्च रोजी संस्थेच्या कार्यालयात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ब्रम्हपुरी कार्यालयाचे अध्याशी अधिकारी साचिन धात्रक यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित ११ संचालकांची सभा पार पडली. यामध्ये संस्थेचे अध्यक्ष म्हणुन अशोक रामटेके, उपाध्यक्ष म्हणुन डॉ. एकनाथ रामटेके व सचिव म्हणुन प्रभाकर रामटेके यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त केल्या जात आहे. सभेचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन व्यवस्थापक शुभम शेंडे यांनी केले.

# शेतकरी आणि वाघाच्या झुंजीत शेतकरी जखमी

ब्रम्हपुरी/का.प्र.

उन्हाळी धानाच्या पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. शेतकरी आणि वाघात झालेल्या लढाईत अखेर वाघाने हार मानली व तो पळून गेला.

तालुक्यातील नांदगाव येथील शेतकरी गोवर्धन डांगे वय ५३ वर्षे यांच्या शेतात उन्हाळी धानाची लागवड केली आहे. नेहमी प्रमाणे गावापासून एक ते दीड किमी अंतरावरील स्वत:च्या शेतावर धानाला पाणी देण्यासाठी सकाळी ७.३० गेले असता, शेतात दबा धरुन बसलेल्या पट्टेदार वाघाने शेतकरी गोवर्धन डांगे याचेवर अचानक हल्ला केला. वाघ व शेतकरी आमने सामने येताच वाघाने गोवर्धन डांगे या शेतकऱ्यावर हल्ला केला. गोवर्धन याचे चेहऱ्यावर पंजे मारले चेहरा रक्त बंबाळ केला. मात्र



गोवर्धनने न घाबरता मोठ्या हिमतीने हातातील मोबाईल खिशात ठेवला. वाघाने पुन्हा हल्ला करताच गोवर्धन यांनी वाघाचे दोन्ही हात मोठ्या ताकतीने पकडले व त्यास जमिनीवर आपटले. यामुळे वाघ घाबरून तिथून पळून दुसऱ्याच्या शेतात गेला. आधीच सावध असलेल्या गोवर्धन यास पुन्हा आपल्यावर वाघ हल्ला करू शकतो म्हणून लगत असलेल्या अभिमान बांडे यांच्या शेतातील विहिरीत उतरून जवळच्या मोबाईलने मुलाला घटनेची माहिती दिली. लगेच मुलगा धम्मदिप डांगे शेतावर आला व जखमी वडीलाला ग्रामीण रुग्णालयात भरती केले. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी यांनी जखमीची भेट घेतली. नांदगावतील शेत शिवारात वाघाचा वावर असून त्वरीत जेरबंद करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# रस्ता तुमच्यासाठी होतोय मात्र जीव माझा जातोय

## वृक्ष वाचविण्यासाठी पर्यावरणप्रेमींची धडपड, रस्ता रुंदीकरणात बेमुर्वत वृक्षतोड

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी वडसा मार्गाच्या रुंदीकरणात शेकडो वर्ष जुनी झाडे तोडण्यात येत आहे. वृक्षतोड झालेला परिसर भकास वाटायला लागला आहे. या घटनेकडे लक्ष वेधून घेण्यासाठी पर्यावरण, वन्यजीव क्षेत्रात काम करणारी संस्था अर्थ कंझरवेशन ऑगनाईझेशनने आगळा वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. यात 'मला वाचवा, रस्ता तुमच्यासाठी मोठा होतोय, मात्र जीव माझा जातोय' असे फलक झाडांवर लावून वृक्ष संवर्धनसाठी लोकांचे लक्ष केंद्रित केले आहे.




ब्रह्मपुरी हे शहर जगातील अतिउष्ण शहरांमध्ये गणल्या जाते. या शहरात अनेक वृक्ष शंभर ते दीडशे वर्षांपासून ब्रम्हपुरीच्या इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. परिसरातील अनेक पिढ्यांनी या झाडांना बघितले आहे. पाण्या पाऊसात, उच्चा तापमानात वाटसरूंना, लहान व्यावसायिकांना या झाडांनी आसरा दिला आहे. मात्र, याच वृक्षांची आता रस्ता रुंदीकरणात कटाई सुरू आहे. आतापर्यंत शेकडो वृक्ष तोडण्यात आली. त्यामुळे हा परिसर आता भकास जाणवायला लागला आहे. पर्यावरण संवर्धनाचा नारा दिला जात असताना दुसरीकडे रस्ता रुंदीकरणात झाडे तोडण्यात येत आहे. यामुळे पर्यावरणप्रेमींची वृक्ष वाचविण्यासाठी धडपड सुरू आहे. अर्थ कंझरवेशन आर्गनायझेशन संस्थेने शहरातील झाडांवर फलक लावले आहे. त्यावर "मला वाचवा, रस्ता तुमच्यासाठी मोठा होतोय मात्र जीव माझा जातोय" अशा आशयाचे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. शक्य होतील तितके वृक्ष वाचवावे. तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या पाचपट झाडे लावून त्यांचे संवर्धन करावे अशी मागणी संस्थेचे अध्यक्ष मनोज वठे, सहसचिव भूपेश राखडे, अक्षय कुथे, आर्यन राखडे, ईशान वठे यांनी मुख्यधिकारी अर्शिया जुही यांच्याकडे निवेदनातून केली आहे. याबाबत राष्ट्रीय रस्ते व विकास प्राधीकरणाकडे निवेदनही पाठविण्यात आले आहे.

**विकास कामांना विरोध नाहीच. मात्र निसर्गाची हानी कमीत कमी होईल याचा विचार करून विकास कामे राबविणे अत्यंत आवश्यक आहे. ही झाडे अनेक पक्षांचे घर आहे. शहरात प्रदूषण व तापमान नियंत्रणासाठी मानवांच्या फायद्याचे आहे.**
*- ललित उरकुडे, वन्यजीव अभ्यासक, ब्रह्मपुरी*

# उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. भुरले यांचा सत्कार

ब्रह्मपुरी/का.प्र.

नॅशनल क्वालिटी ॲशुरन्स सर्विस व कायाकल्प अभियानात सहभागी होऊन सर्व निकष यशस्वीपणे पूर्ण करुन उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे गांगलवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित भुरले यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आला.

प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवा, आरोग्य केंद्रातील अंतर्गत स्वच्छता, रंगरंगोटी, वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या आरोग्य विभागाच्या विविध योजना, आरोग्य शिबिरे याबाबतीत गांगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र अव्वल आहे. दवाखान्यातील संपूर्ण दस्ताऐवज अपडेट आहे. गरोदर मातांची प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुती होण्याचे प्रमाण चांगले आहे. या सर्व बाबींना अनुसरून तपासणी करण्यासाठी इतर जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी गांगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. संपूर्ण बाबींची काटेकोरपणे तपासणी करून अहवाल सादर केला. त्यामध्ये गांगलवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची कामगिरी बघून त्यांनी सदर केंद्राला उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून नमुद केले आहे. या केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित भुरले यांना गौरविण्यात आले आहे. तत्कालीन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विलास दुधपचारे, तालुका आरोग्य अधिकारी मंदोधरा सुखदेवे आणि रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभल्याची प्रतिक्रिया वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत भुरले यांनी दिली.

आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...
थोड्याच अवधीनंतर
ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper
प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी
: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७९५३९५

# जलजीवन मिशनने फुलविले नागरिकांच्या चेहऱ्यावर हसू

## तालुक्यातील २३ गावांत सौरऊर्जेच्या माध्यमातून होणार पाणीपुरवठा



ब्रह्मपुरी/

केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्याच्या अनुषंगाने जलजीवन मिशन अंतर्गत कालबद्ध कार्यक्रम आखुन अस्तित्वात असलेल्या नळ योजनांचे पुनर्जीवन करणे व नवीन नळ योजनांची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली असून सदर योजनेचा आराखडा तयार करतांना गावातील प्रत्येक व्यक्तीला प्रति दिवस ५५ लीटर पाणी पुरविण्याचे नियोजन ठेवून ९९ योजनांचे आराखडे तयार करण्यात आले.

ब्रम्हपुरी तालुक्यामध्ये एकुण ९९ योजनांचा आराखडा तयार करुन गावातील प्रत्येक कुटुंबाच्या घरापर्यंत पाणी पोहचविण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले. सद्यस्थितीत ९९ पैकी ५५ योजनांची कामे भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आली असून ४४ योजनांची नळ जोडणीची कामे शंभर टक्के पुर्ण करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे एकुण आराखड्यापैकी २३ योजना सौर उर्जेवर आधारित तयार करण्यात आल्या असुन विद्युत बिलाच्या तणावामधून ग्रामस्थांना कायम मुक्त करण्यात आले आहे. त्यातील १५ योजनांचा पाणी पुरवठा अविरत सुरु आहे. या यशस्वी योजनापैकी गायडोंगरी, परसोडी (झिलबोडी) व माहेर या तिन्ही योजनांचा पाणी पुरवठा सौर पंपाद्वारे होत असल्याने, ग्रामस्थांना पाणीपट्टीच्या करापासून कायम मुक्तता झाली. या तिन्ही योजनांद्वारे सर्व कुटुंबांना आवश्यक व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. योजनांच्या यशस्वी कार्यान्वयाबाबत सरपंच सचिव व ग्रामस्थांनी आभार मानुन समाधान व्यक्त केले आहे

या संदर्भात अधिक जाणून घेण्यासाठी आमचे प्रतिधिनी ग्रामीण पाणी पुरवठा शाखा अभियंता साहेबलाल मेश्राम यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सदर योजनांचा आराखडा तयार करण्यापासून ते कार्यान्वित करण्यापर्यंतची ईतंभुत माहिती दिली. सदर योजनांची कामे करताना येणाऱ्या प्रशासकीय तांत्रिक अडचणी तसेच स्थानिक अडचणी आल्या त्या मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शक सुचना तसेच कार्यकारी अभियंता हर्ष बोहरे तसेच उपविभागीय अभियंता ओमराज हेडाऊ यांच्या मार्गदर्शनात सोडवून यशस्वी करण्यात आल्याचे व उर्वरित योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत व लवकरच पूर्ण करण्याचा मानस शाखा अभियंता मेश्राम यांनी व्यक्त केला आहे.

# 'छावा' चित्रपटातील कलाकार 'आशिष पाथोडे'सोबत रंगल्या गप्पा


(आशिष पाथोडे सत्कार स्विकारतांना)

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागभीडच्या मातीतून जन्माला आलेल्या कलाकाराने अल्पावधीतच मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीत अभिनयाची छाप उमटविली. त्या कलाकाराचे नाव आहे 'आशिष पाथोडे'. पूर्व विदर्भातील या युवा कलाकाराने नागभीड, ब्रम्हपुरी क्षेत्राचे नांव सिनेसृष्टीच्या नकाशात कोरले. अशा कलाकाराचा सत्कार समारोह व प्रेक्षकांशी हितगुज कार्यक्रमाचे आयोजन ॲड. गोविंद भेंडारकर यांच्या पुढाकाराने स्वागत मंगल कार्यालयात करण्यात आले.

छावा चित्रपटाविषयी उत्सुकता प्रेक्षकांमध्ये होतीच. त्या चित्रपटातील विविध कंगोरे जाणून घेण्याविषयी नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह होता. नॅशनल स्कुल ऑफ ड्रामा या जगप्रसिध्द अभिनयाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेतून आशिषने पदवी प्राप्त केली. यानंतर त्याने मागे फिरून पाहिले नाही. प्रेक्षकांशी हितगुज साधतांना त्याने सुरुवातीच्या काळातील संघर्षगाथा कथित केली. प्रचंड मेहनत, आत्मविश्वास व अभिनय कौशल्याच्या आधारावर त्याने सिनेसृष्टीत स्थान निर्माण केले. छावा चित्रपटातील 'अंताजी'च्या भूमिकेत तो प्रेक्षकांना दिसला. राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'टपाल' या मराठी चित्रपटात महत्वाची भूमिका वठवली. अभिनयच नव्हे तर चित्रपटातील कलाकारांना संवाद कौशल्याचे प्रशिक्षण देण्याच्या कार्यात तो निपूण आहे. 'तानाजी' या चित्रपटात अजय देवगण व सैफ अली खान तसेच छावा या सिनेमात विकी कौशलला संवाद कौशल्याचे प्रशिक्षण आशिष पाथोडे यांनी दिले. दीपक सेमस्कर यांनी आशिष पाथोडेची प्रकट मुलाखत घेतली. यामध्ये पाथोडेने प्रेक्षकांच्या विविध प्रश्नांना रोचक उत्तरे देऊन त्यांना रिझविले.


सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. विवेक शिंदे यांनी भूषविले. याप्रसंगी ॲड. गोविंद भेंडारकर, डॉ. एन.एस. कोकोडे, जेष्ठ पत्रकार प्रा. विजय मुडे, सुप्रसिध्द व्यापारी इकबाल जेसानी, डॉ. खिजेंद्र गेडाम, माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमूरकर, शिवछत्रपती फाऊंडेशनचे अध्यक्ष मोंटू पिलारे, पोलीस निरिक्षक प्रमोद बानबले व्यासपीठावर उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शिवछत्रपती फाऊंडेशन, सांझविहार अकॅडमी, संभाजी ब्रिगेड, जनमंच तथा पी.आर.डी. स्पोर्टचे सहकार्य लाभले.

# खिस्तानंद विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक वर्गाचा पदवी समारंभ

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक खिस्तानंद स्कुल अँन्ड ज्युनिअर कॉलेज येथे पुर्व प्राथमिक वर्गांचे पदवी समारंभ कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन खिस्तानंद विद्यालयाचे व्यवस्थापक फादर कुरीयन तर प्रमुख अतिथी म्हणुन ब्रम्हपुरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मयुर लाडे, मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिन्सिटा प्रामुख्याने उपस्थित होत्या.

यावेळी नर्सरी ते के.जी.२ च्या विद्यार्थ्यांनी रंगारंगीचे नृत्य सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. सर्व अतिथिंच्या हस्ते के.जी.२ च्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी मयुर लाडे यांनी पुर्व प्राथमिक वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याचे भरभरुन कौतुक केले व ब्रम्हपुरीच्या शैक्षणिक योगदानात खिस्तानंद विद्यालयाचा मोलाचा वाटा आहे. या प्रकारचे विचार त्यांनी व्यक्त केले व विद्यालयाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल विद्यालयाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष फादर कुरीयन यांनी सुद्धा आपले मत प्रकट केले.




कार्यक्रमाचे संचालन पुर्व प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य पालक वर्गांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका सिस्टर पावना यांच्या मार्गदर्शनाखाली हिना रामटेके, पल्लवी मेश्राम, शालिनी जांभुळकर, अश्विनी किरमीरे, रजनी गणविर, लेकराम डेंगे यांनी अथक परीश्रम घेतले.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**
**पर्यावरणाचे**
**रक्षण करा...**

## रजिस्ट्रेशन ऑफ न्युजपेपर
रूल्स १९५६ अंतर्गत
### अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार
मालकी व अन्य माहिती तक्ता - ४
(नियम ८ पहा)

| | | |
|---|---|---|
| १) वृत्तपत्राचे नांव | : | अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार |
| २) प्रकाशनाचे ठिकाण | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ३) प्रकाशन काळ | : | अर्धसाप्ताहिक |
| ४) मुद्रकाचे नांव | : | राजीव पाचपोर |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु. मोदी नं. १ सिताबर्डी, नागपूर |
| ५) प्रकाशकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ६) संपादकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ७) वृत्तपत्र मालकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |

**मी अशोक भैया असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशिल पुर्णपणे खरा आहे.**

**स्वाक्षरी**
**अशोक भैया**
दि. २०/०३/२०२५
प्रकाशक/मालक/संपादक

**... QUOTES ...**

**"Corruption is a cancer : A cancer that eats away at a citizen's faith in democracy, diminishes the instinct for innovation and creativity."**
**- joe Biden**

**चारोळी**

*तुझ्या त्या हसण्याचा गडगडाट*
*अजून कानात घुमतो आहे...*
*तुला होकार दिला लग्नासाठी,*
*त्यानंतर मी हसणेच विसरलो आहे...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

## वर्धिनी व्यसनमुक्ती केंद्राला अनिकेत समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची भेट

देसाईगंज/प्रतिनिधी

व्यसनाधीनता माणसाच आयुष्य कसं उध्दवस्त करते याची अनेक उदाहरणे आपल्याला समाजात नेहमीच बघायला मिळतात. परंतु व्यसनाधीन झालेल्या माणसाचं व्यसन सोडवून त्या माणसाला निर्व्यसनी बनवता येते. यासाठी अनेक संस्था कार्यरत असुन याच सामाजिक भावनेतून ब्रम्हपूरी शहरातील बाजार चौकात प्रमिला बुराडे फाउंडेशन अंतर्गत वर्धीनी व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात अनेक व्यसनाधीन व्यक्तींना निर्व्यसनी बनवून त्यांचे पुनर्वसन केले जात आहे.

या व्यसनमुक्ती केंद्राला नुकतीच वडसा येथील अनिकेत समाजकार्य महाविद्यालयातील बी.एस.डब्लू. व एम.एस.डब्लू. अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. सदर भेटीदरम्यान संस्थेचे संचालक वैभव सुरेश बगमारे यांनी व्यसनाधीन व्यक्तींचे व्यसन सोडवून त्यांचे पुनर्वसन कसे केले जाते याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रा.दिपक बांडे, प्रा.डी.टी.गजभीये व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


# ग्रामपंचायत पारडगावमधील कागदपत्रांची जाळपोळ संशयाच्या भोवऱ्यात



ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलुप तोडून ग्रामपंचायतीतील कपाटातील कागदपत्रांना अज्ञात इसमाने आग लावल्याची घटना १६ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ब्रम्हपूरी तालुक्यातील पारडगाव येथे घडली आहे. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयात ठेवलेले महत्वपूर्ण दस्तऐवज आगीत भस्मसात झाले आहेत.

गावाचा कारभार चालविण्यासाठी शासनातर्फे ग्रामपंचायतची निर्मिती करण्यात आली. याच ग्रामपंचायत अंतर्गत गावात झालेले जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी, गृहकर-पाणीकर वसुली, गावाच्या विकासासाठी योजना राबविणे यांसारखे अनेक महत्वपूर्ण कामे केल्या जातात. ब्रम्हपूरी तालुका मुख्यालयापासुन सुमारे ४ किमी अंतरावर असलेल्या पारडगाव येथील मुख्य चौकात ग्रामपंचायत कार्यालय आहे. १६ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात इसमाने ग्रामपंचायत कार्यालयात प्रवेश करून महत्त्वपूर्ण दस्ताऐवज असलेल्या आलमारीचा कुलूप तोडून ते पेट्रोल टाकून पेटवून दिले. घटनेची माहिती मिळताच सरपंच पिंटु पिल्लेवान यांना ग्रामपंचायतीचे दार उघडे दिसले. तेव्हा गावचे पोलिस पाटील यांना बोलावून ब्रम्हपूरी पोलिस स्टेशनला सदरची माहिती कळविण्यात आली. तात्काळ पोलिसांनी घटनास्थळ गाठले. त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पाणी टाकुन आग विझविण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयातील कागदपत्रांची जाळपोळ करण्यासाठी अज्ञात इसमाने पेट्रोलचा वापर केला, त्यासंबंधीचा पुरावा म्हणून पेट्रोल बॉटल सदर ग्रामपंचायत मध्ये आढळून आली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या गेटचे कुलूप तोडण्यात आले, मात्र घटनास्थळी कुलूप आढळून आले नाही? त्यामुळे सदर प्रकार हा जाणीवपूर्वक कटकारस्थान असल्याचे बोलले जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयात विकास कामांमध्ये तर काही अनियमितता नसावी ना?असाही प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयामार्फत गोळा केलेला कराचा भरणा संबंधित कर्मचाऱ्याकडून ग्रामपंचायत मध्ये भरण्यात आला नसल्यामुळे तर कागदपत्रांची होळी केली नसावी ना? मार्च एंडींग असल्यामुळे आपली गैरकृत्य बाहेर येवून, आपले पितळ उघडे पडणार? त्यामुळे नियोजित कट आखून, त्याला मूर्त रूप देण्यासाठी हा प्रकार घडवून आणला आहे? एक नव्हे अनेक प्रश्न लोकचर्चेद्वारे चर्चिले जात आहेत. त्यामुळे अज्ञात आरोपीकडून पारडगांव ग्रा.पं.तील करण्यात आलेली कागदपत्रांची होळी प्रकरण अद्यापही संशयाच्या भोवऱ्यात आहे.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स


गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# पोलीसांना मिळणार रेती माफियांवर कारवाईचे अधिकार

## आठवड्याभरात नवीन वाळू धोरण आणणार, महसूलमंत्री बावणकुळे यांची विधानपरिषदेत माहिती

ब्रम्हपुरी/का.प्र.

वाळूमाफियांवर थेट कारवाई करण्याचे अधिकार आता पोलिसांना दिले जाणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी विधानपरिषदेत दिली.

तस्करी प्रकरणात आत्तापर्यंत महसूल अधिकाऱ्यांचे संरक्षण करण्याएवढेच पोलिसांना अधिकार होते. त्यांना वाळूमाफियांवर कारवाईचे थेट अधिकार नव्हते. मात्र, येत्या आठवडाभरात नवीन वाळू धोरण आणण्यात येणार असून, यामध्ये वाळू माफियांवर कारवाईचे जेवढे अधिकार महसूल अधिकाऱ्यांना आहेत, तेवढेच अधिकार पोलिसांना दिले जाणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.



वाळू तस्करी प्रकरणात अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाईचे संकेतही त्यांनी दिले.

गोदावरी नदीपात्रातून होत असलेल्या बेकायदा वाळू उपशासंदर्भात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रश्न विचारला होता. त्याला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तलाठी, यांची संमती असल्याशिवाय वाळू उपसा केला जात नाही. मात्र, राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही. तसेच, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपशाबाबत ७ दिवसांत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. तोपर्यंत संबंधित निविदा आणि कार्यादेश रद्द करीत असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. यावरील चर्चेत प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनीही भाग घेतला.

वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलिस दलाकडून एकत्रित कारवाई करण्यात येते. असे असले तरी वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे. येत्या आठवडाभरात हे धोरण आणले जाईल. वाळू धोरण तयार करण्यासाठी जनतेकडून सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यासंदर्भात २५० हून अधिक लोकांकडून चांगल्या सूचना आल्या असून, हे धोरण आल्यानंतर राज्यात वाळूची तस्करी, अवैध उपसा होणार नाही, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांमध्ये सक्शन पंपाच्या मदतीने सुरू असलेल्या वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

### दगडापासून वाळू तयार करणार

**राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून, त्यानुसार आता 'एम सँड' म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर दिला जाईल. याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारून त्यासाठी अर्थसाहाय्य देण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशाप्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. त्यास उद्योगाचा दर्जा दिला जाणार आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून पुरवठा आणि मागणी यातील तफावत दूर होईल. त्याद्वारे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल, असे ते म्हणाले.**


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404